Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-4 | Issue-1 | July-2014 Available online at www.aygrt.isrj.net

भारतीय राजकारण : नवीन बदल

राजेंद्र नामदेव मोरे

एम.ए एम.फिल; पीएच.डी; सेट;नेट , राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संत रामदास कला,वाणिज्य व वि–ान महाविद्यालय,घनसावंगी जि.जालना.

सारांश - घटनाकारांनी भारतासाठी संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केला.या प्रणालीच्या संचालनासाठी राजकीय पक्ष अनिवार्य होते.परंतु भारतीय राज्यघटनेत राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्याविषयी उल्लेख नव्हता.राजकीय पक्षांची स्थापना त्यांचा विकास प्रतिनिधीक लोकशाहीमध्ये आवश्यक आहे.कारण राजकीय पक्षाजवळ संघटन शक्ती आणि विशिष्ट कार्यक्रम असतो.म्हणून राजकीय पक्षाला लोकशाहीचा आत्मा असे म्हणतात.राजकीय पक्ष मतदारांना संघटित करतो.

प्रस्तावना-

कायदेशीर तरतुदीनूसार निवडणूक आयोगाला नोंदणी तसेच निवडणूक चिन्ह वाटण्याचा अधिकार असतो.पक्ष बदल संदर्भात घटनेच्या १० व्या अनुसूची मध्ये राजकीय पक्षांचा उल्लेख करण्यात आला आहे.भारतीय स्वातंत्र्याच्यावेळी जे काही राजकीय पक्ष अस्तित्वात होते.त्यानंतरच्या काळात विविध विचारधारेचे, कार्यक्रमाचे तसेच विविध संगठनात्मक संरचनेच्या पक्षाचा उदय –ाल्याचे दिसून येतो.स्वातंत्र्यानंतर प्रथम निवडणूक (१९५२) मध्ये अनेक राजकीय पक्ष विद्यमान होते. १९७७ पर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे वर्चस्व केंद्र व राज्यामध्ये होते.१९६७ मध्ये सात राज्यात गैरकाँग्रेसी सरकारे सत्तेवर आली होती.काँग्रेसच्या प्रभुत्वाचे कारण म्हणजे १८८५ पासून काँग्रेस अस्तित्व राहणे.स्वातंत्र्य आंदोलनात काँग्रेसची महत्त्वपुर्ण भूमिका, महात्मा गांधी,सरदार पटेल,जवाहरलाल नेहरू,तत्सम नेत्यांचे योगदान व देशभर त्यांचे संघठन आणि प्रसार कारणीभूत आहे.स्वांत्र्यतानंतर पहिल्यांदा १९७७ मध्ये केंद्रात काँग्रेस पक्षांचा पराभव –ाला.काँग्रेस पक्षांचे प्रभुत्व संपुष्ठात येऊन जनता पार्टीचे सरकार सत्तेवर आले.१९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा गांधीच्या काँग्रेस (आय) पक्षाला भरघोस यश लाभले.

३१ आक्टो १९८४ ला इंदिरा गांधीच्या हत्येनंतर १९८४ साली सार्वत्रिक निवडणुक –ाली.यामध्ये काँग्रेस (आय) पक्षाला ‘न भूतो न भविष्यती’ असे विक्रमी यश लाभले.काँग्रेस पक्षाला लोकसभेत निर्विवाद बहुमत प्राप्त –ाले.त्यामानाने बाकीच्या विरोधी पक्षांना फारच कमी जागा मिळाल्या साहजिकच काँग्रेस पक्षांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण राहिले नाही. 3ÔÅ™Ö“ÔÖ¸¡¸»ÖÖ“Ö»Ö“Ö¯ÖŸÖ सत्तेचा गैरवापर यामध्ये सत्तारूढ पक्ष अडकला गेला.या सर्व गोष्टीचा परिणाम होऊन १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा ¯Ö¸Ô3Ö¾Ô –ाला. १९९१ च्या मध्यवर्ती निवडणूका –ाल्या त्यात काँग्रेस पक्षाची प्रगती होऊन काँग्रेस सत्तास्थानी आली परंतु काँग्रेस जशी प्रभुत्वशाली होती तशी राहिली नाही त्या अनुषंगाने काँग्रेसचा ऱ्हास –ाला व भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर आली.त्याचबरोबर प्रोदशिक पक्षाचा उदय होऊन त्यांची राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका ठरली.तेव्हा या पार्श्वभूमीवर भारतीय राजकारणाचे मूल्यामापन करणे क्रमप्राप्त ठरते.

भारतीय राजकारण नवीन बदलांचे विश्लेषण करण्यापुर्वी काही प्रश्न उपस्थित करून त्यांच्या उत्तरार्थ मांडणी करत आपल्याला निष्कर्षापर्यंत जाता येईल.प्रस्तुत लेखात प्रामख्याने काही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

कॉंग्रेसची प्रभुत्वाची भूमिका राहीली नाही ? राष्ट्रीय राजकारणात मंडल आयोगाच्या मुद्यांची भूमिका तपासणे ? †ÖÖ›¶Ö सरकारचा काळ आणि राजकारण सांप्रदायिकता,धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही राजकारण एका नव्या समान पक्षांचा (भाजपा) उदय,वरील प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधात पुर्णमांडणी करून सद्यस्थितीत भारतीय राजकारण कोणत्या वळणावर आहे याचा वेध घेता येईल गेल्या २५ वर्षातील भारतीय राजकारणाचे नवीन बदलांच्या संदर्भात चढ-उतार शोधत तसेच बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चिकित्सा करावी लागेल.

विवेचनाचा दूसरा मुद्दा म्हणजे भारतीय राजकारण नवीन बदलाच्या संदर्भात कितपत यशस्वी –ाले यांची चिकित्सा करावी लागेल.

मंडल आयोग :-_ २ डिसेंबर १९८९ रोजी जनता दलाचे विश्वनाथ प्रतापसिंग भारताचे पंतप्रधान –ाले.व्ही.पी.सिंग यांच्या राष्ट्रीय मोर्चा (आघाडी) सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावनीला प्रामुख्याने प्राधान्य दिले.२२ डिसेंबर १९७८ रोजी जनता सरकारने बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नियुक्त केला.भारतीय राज्यघटनेच्या ३४० (१), १५(४) आणि १६ (४) या कलमांचा वेळावेळी न्यायालयांनी दिलेला निर्णय याचा विचार करून मंडल आयोगाने ओ.बी.सी.ची व्याख्या व याद्या तयार केल्या. ३१ डिसेंबर १९८० रोजी मंडल आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. मंडल आयोगाची अमंलबजावणी करण्यासाठी ५२% लोकांचे हित साध्य होणार हे जाणून "१३ आगस्ट १९९० रोजी "व्ही.पी.सिंग यांच्या सरकारने मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्याची अधिसुचना काढली."[1] त्याचा परिणाम म्हणून देशभरात आंदोलने जाळपोळ व दंगली घडून आल्या;ह्याच वेळी भारतीय जनता पक्षाने आयोध्येतील राम मंदिर उभारणीचा प्रश्न पुढे करून रथयात्रेचा कार्यक्रम सुरू केला हा कार्यक्रम पुढे आणून लालकृष्ण आडवाणी यांनी आयोध्या राम मंदिराचा प्रश्न पुढे आणुन मंडल आयोगाला विरोध केला.भाजपाच्या पाठिंब्यावर असलेले व्हि.पी.सिंग सरकारनी तडजोडीची भूमिका स्वीकारून सहमतीचे धोरण ठेवावे यासाठी प्रयत्न केले.लालकृष्ण अडवाणी यांनी तडजोड न स्वीकारता रथ यात्रा सुरू केली.

आयोध्या राम जन्मभूमी परिसरात जमाबंदी आदेश –ूंगारून वादग्रस्त धर्मस्थळाकडे कारसेवक जावू लागले.पोलिसांनी लाठीमार गोळीबार केला याला मुख्यमंत्री मुलायसिंग यादव व व्ही.पी.सिंग यांना जबाबदार धरण्यात येऊन भाजपाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पाठींबा काढुन घेतला १६ नोव्हेंबर १९९२ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने बहुमताने दिलेल्या निवाडयानुसार इतर मागासवर्गीय लोकांसाठी २७% आरक्षण ठेवण्यावर शिक्कामोर्तब –ाले.या सर्व घडामोडींचा परिणाम असा –ÖÖ»ÖÖ की,सर्वोच्च न्यायालयांनी बहुमतांनी निर्णय (६ : ३) देताना म्हटले की, "दोन वर्षापुर्वी राष्ट्रीय मोर्चा सरकारव्दारे इतर मागास प्रवर्गासाठी २७% आरक्षणाचा जो आदेश देण्यात आला; तो निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने बहुमताने दिलेल्या निर्णयानुसार इर मागासवर्गीय लोकांसाठी २७% जागा राखीव ठेवण्यावर श्क्किामोर्तब –ाले.पुढे वैध आहे तो निर्णय लागू करण्यासाठी योग्य आहे; १९९० मध्ये जनता दलाने घेतलेल्या निर्णयामुळे उत्तरप्रदेश,हरियाना,राज्यस्थान,गुजरात,बिहार या राज्यात जनता दलाचा विशेष प्रभाव पडला. "१९९० नंतर जनता दलात फूट पडून 'समाजवादी जनता दलाची स्थापना –ÖÖ»ÖÖ.'[3] चंद्रशेखर इतर पक्षांच्या तसेच जनता दलांतील ६३ खासदारांच्या जोरावर पंतप्रधान –ÖÖ»Ö.

मंडल आयोगाच्या अंमलबजावनीच्या निर्णयामुळे इतर मागास वर्ग आपल्या ओळखीसाठी अधिक जागरूक –ाला.या दरम्यान अनेक पक्ष समोर आले त्यांनी रोजगार शिक्षण तसेच अन्य क्षेत्रात इतर मागासवर्गीयांना चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.त्यांचे मत होते की,इतर मागास प्रवर्ग भारतीय समाजातील मोठा हिस्सा आहे.या आधारांवर शासनामध्ये त्यांना योग्य प्रतिनिधीत्व मिळणे लोकशाहीचे पाऊल ठरेल.

पी.व्ही.नरसिंगराव यांच्या घोषणेमुळे इतर मागास प्रवर्गांना २७% तसेच उच्च जातींना १०% आरक्षण देतांनी न्यायालयांनी हा निर्णय दिला परंतू १९९० ची घोषणा आणि नरसिंगराव यांच्या घोषनेत चार महत्त्वपुर्ण परिवर्तन के»Ö.'मागास जातीतील संपन्न व्यक्तींना लाभ मिळणर नाही आरक्षण ५०% पेक्षा अधिक होऊ शकत नाही.आरक्षण केवळ नोकरीमध्ये असेल; पदन्नोती मध्ये

नसेल.सरकारव्दारे आरक्षण योग्य जातीचा शोध घेतला पाहीजे.हा शोध गैर-हिंदु,पारशी आणि शिख समुदयात »ÖÖ¾Ö»Ö ¯ÖÖ×Æ•Ö’[5] मागास प्रवर्गासाठी सरकारनी संसदेत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग - अधिनियम १९९३ ला पास केला.१९९३ मध्ये न्यायमुर्ती आर.एन.प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली व सदस्यीय राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाची स्थापना करण्यात आली.

मंडल आयोगाच्या राजकारणामुळे देशात इतर मागास वर्गीयांच्या नेतृत्वाचा देखील राजकीय उदय –ाला.१९८० च्या दशकात दलित राजकीय संगठनाचा उदय –ाला.१९७८ मध्ये ‘²ÖÖ´ÖÃÖ±ú’ “Ö संगठन –ाले.या संगठनेनी अनुसूचित जाती अनुसूचित - जमाती तसेच इतर मागास प्रवर्ग आणि अल्पसंख्याकांची राजकीय सत्तेच्या राजकारणाला पाठिंबा दिला. ‘राजकीय सत्ता हस्तगत करण्याची भूमिका मांडली त्या“Ö ¯Ö×¾ÖÙÜÖÝÖ ºÞ¯Ö ¤ü»ÖÝÖ - शोषित समाज संघर्ष समिती आहे.बहुजन समाज पार्टीचा उदय –ाला.या पार्टीची सुरूवात काशीराम यांनी केली.सुरूवातीला या पक्षांनी पंजाब हरियाना आणि उत्तरप्रदेश मध्ये ¤ü»ÖÝÖÖ“Ö समर्थन प्राप्त केले.परंतु या पक्षाला १९८९ आणि १९९१ च्या निवडणुकीत या पार्टीला उत्तर प्रदेशात यश मिळाले. भारतामध्ये पहिल्यांदा दलित मतदारांच्या पाठींब्यावर त्यांना राजकीय यश प्राप्त –ाले.यानंतर अनेक वेळेस बसपा उत्तरप्रदेश मध्ये सत्तेवर आली.’[4] पक्षाला दलित मतदार समर्थन करतात.परंतु समाजातील इतर मागासवर्गाचा जनाधार पक्षाला प्राप्त होत आहे.भारतात काही भागात दलित राजकारण आणि इतर मागास प्रवर्गांनी राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

मंडल आयोगाच्या भूमिकेने १९८९ नंतर भारतीय राजकारणात महत्त्वाची भूमिका पार पाडली.त्याचबरोबर रामजन्मभूमी आंदोलने देखील सर्वोच्च स्थानांवर होते.याचा परिणाम असा –ाला की,‘१९८४ मध्ये ७.४% मतदान घेऊन भाजपाने २ जागा मिळविल्या त्या १९८९ मध्ये ११.५% मतदान घेवून ८६ जागा मिळविल्या तर १९९१ पर्यंत २०.१% मतदान घेऊन १२० जागा संपादन केल्या.’[6] ह्या जागा १९९९ पर्यंत अशा वाढत राहिल्या.याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भाजपाने हिंदुत्ववादी जनआंदोलने होय.

आघाड्याचा काळ :-

_____‘१९८९ मध्ये काँग्रेसचा पराभव –ाला.लोकसभेत सर्वात (१९७ जागा) मोठा पक्ष असला तरी त्यांनी विरोधी पक्षात बसणे पसंद केले’[7] राष्ट्रीय लोकशाही आघाडीला इतर प्रादेशिक पक्षांचा पाठींबा मिळाला.भारतीय जनता पार्टीच्या ८६ सदस्यांनी आणि डाव्या आघाडीच्या ५२ सदस्यांनी राष्ट्रीय आघाडी सरकारला पाठींबा दिला.या दोन्ही परस्पर विरोधी पक्षांचा पाठींबा राष्ट्रीय मोर्चा (आघाडी) सरकारला मिळाला. या बदलामुळे केंद्र - राज्य सरकारचे आघाडी सरकारला प्रारंभ –ाला.प्रादेशिक पक्षांनी आघाडी सरकार बनविण्यासाठी महत्वपुर्ण भूमिका पार पाडली.

‘१९९१ च्या निवडणूकीनंतर राजकीय शक्तीचे ध्रुवीकरण होण्यास सुरूवात –ाली.मात्र विविध पक्षांची वाढत जाणाऱ्या आघाड्यामुळे बहुदलीय पध्दती कायम राहिली.१९९६ च्या निवडणुकीनंतर केंद्र-राज्यातील एकदलीय प्रभुत्वाचा शेवट –ाला.केंद्रामध्ये 13-१४ पक्षांची अल्पमतातील सरकार सत्तेवर आली;ज्यांना काँग्रेस आणि मार्क्सवादी साम्यवादी पक्षाचे बाहेरूनÖ समर्थन मिळाले.१९९८ मध्ये १२ व्या लोकसभेची विशेषतः राहिली की; देशात तीन राजकीय शक्तीमध्ये आघाड्याचे ध्रुवीकरण –ÖÖ»Ö’[8] भाजपा आणि सहयोगी पक्ष तसेच काँग्रेस आणि सहयोगी पक्ष तसेच सयुक्त फ्रन्ट आदी.१९८९ मध्ये भाजपा आणि डाव्या आघाडीने काँग्रेसला सत्तेपासुन दुर ठेवण्यासाठी राष्ट्रीय मोर्चा सरकारला समर्थन दिले.त्यावेळी डाव्या आघाडीने काँग्रेसत्तर पक्षाला समर्थन सुरू ठेवले.परंतु संयुक्त मोर्चा सरकारला देखील काँग्रेसने समर्थन दिले.खरे तर काँग्रेस आणि डाव्यांना भाजपाला सत्तेपासुन दु¸ ठेवायचे होते.परंतु त्यांना जास्त दिवस यश मिळाले नाही.‘भाजपानी १९९१ तसेच १९९६ मध्ये अनुक्रमे १२० व १६१ जागा प्राप्त करून स्थिती मजबुत केली’[9] त्यांना सरकार स्थापण करण्यासाठी आमंत्रण मिळाले मात्र अधिकांश पक्षांनी भाजपाच्या विरोधात धोरण ठेवल्याने त्यांना लोकसभेत बहुमत सिध्द करता आले नाही.शेवटी भाजपाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या रूपात सत्तेत आली.मे १९९८ ते जून १९९९ म्हणजेच १३ महिने सत्तेवर राहिली.पुन्हा १९९९ मध्ये एनडीए ला सत्ता प्राप्त –ाली.या एनडीए चे

पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयींच्या –ाले.या सरकारनी २००४ पर्यंत आपला कार्यकाळ पुर्ण केला.'१९८९ नंतर आघाडी सरकारे आस्तित्वात आली.समर्थन पक्षांच्या जोरावर सत्तास्थानी आली.'[10] मात्र ही सरकारे अल्पकाळ ठरली या नव्या काळात प्रादेशिक पक्षाची आघाडी किंवा त्यांच्या समर्थनाने केंद्र सरकार बनली.ही बाब १९८९ ची राष्ट्रीय मोर्चा सरकार १९९६ व १९९७ ची संयुक्त मोर्चा सरकार १९९८ आणि १९९९ मधील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार सत्तेवर आली. १९८९ मध्ये सत्तेवर आलेल्या राष्ट्रीय मोर्चा सरकारला फारच कमी जनादेश प्राप्त होता. १९९९ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पुर्ण बहुमत होते.च्या अगोदर ज्या पक्षांची सरकार स्थापन –ाले त्यामध्ये कोणत्याही पक्षाला जनाधार नव्हता.राजकीय परिस्थितीचा तो परिणाम होता.'लोकशाहीमध्ये 'जनाधाराशिवाय शासन' शोकांतीका आहे.या सरकारमध्ये शह-काटशह खेळ दिसून आला.या आघाडी सरकारनी राजनितीक †ÛÃ£Ö¸ता आणि काही परिस्थितीत अस्थीरतेला जन्म दिला.'[11] राजकीय अस्थीरतेमुळे प्रशासकीय यंत्रणेवर आघात बसला.भारता सारख्या विकसनशील आणि समस्याग्रस्त देशात राजकीय स्थायीत्वाचे महत्त्व आहे.अशा सरकारमुळे केंद्र-राज्य संबंधात मतभेद व तनावला जन्म दिला आणि विघटनवादी तत्त्वाला प्रोत्साहन दिले; असे असले तरी केंद्रीय स्तरांवर आघाडी सरकार राजकीय विवशतेचा परिणाम आहे.निवडणुका अगोदर आघाडी असेल तर जनाधार शक्तीला वैधता प्राप्त असेल.बाहेरिल समर्थन लोकशाहीच्या सिध्दांताचे उल्लघन करतात.बाहेरून समर्थन देणाऱ्या पक्षांनी नेहमी सातत्यपुर्ण दबावाचे राजकारण केले आहे.२००४ ¾Ö 2009 ´Ö¬ÖßÖ»Ö ÃÖयुक्त प्रगतीशील आघाडी यांना समान रूपात लागू होतो.मागील काही दशकापासुन भारतीय समाजात ÜÖÖ ²Ö¤»Ö होत होता आणि ज्यांनी अशा बदलाच्या प्रवृत्तीला जन्म दिला,तो म्हणजे भारतीय राजकारणात आघाडी सरकारचे युग होय.

प्रादेशिक पक्षांचा उदय :

१९६० च्या दशकापासून विभिन्न समूह काँग्रेस पक्षापासून अलग होऊ लागले. त्यांनी आपली स्वत:ची पार्टी बनविली.१९७७ नंतर भारतीय राजकारणात प्रोदशिक पक्षांचा उदय –ाला.या सर्व कारणामुळे काँग्रेस पक्ष कमकुवत –ाला.जनता पार्टीचे सरकार उत्साहाच्या वातावरणात आले या घटनेत तत्कालीन भारतीय राज्यघटनेत 'स्वांत्र्यानंतरच्या ३० वर्षानंतर दुसरी क्रांती'[12] चे नांव ×¤»Ö.

उदा.नॅशनल कॉन्फरन्स जम्मू-काश्मीरमध्ये, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, रिपब्लिकन असे पक्ष महाराष्ट्रात, अकाली दल पंजाबमध्ये,द्रमुक पक्ष तामिळनाडूमध्ये,तेलगू देसम आंध्रमध्ये आसामगण परिषद आसाममध्ये मि–ो नॅशनल फ्रट मि–ोशममध्ये,–ारखंड मुक्ती मोर्चा –ारखंडमध्ये,हरियाना विकास पार्टी हरियानामध्ये आपले अस्तित्व टिकवून असलेले दिसतात.

सध्या भारतात (२०१४ पर्यंत) ४७ प्रादेशिक पक्ष म्हणून अस्तित्वात आहे.प्रजासमाज पक्ष (चिरंजीवी) काँग्रेसमध्ये विलीन –ाला तर राष्ट्रवादी मनीपूरी काँग्रेस (पी.ए.संगमा) यांचा नवीन पक्ष उदयाला आला.ह्या अलीकडील घटना †ÖÆ.

प्रादेशिक पक्षांच्या केंद्राच्या पाठींब्यामुळे तसेच सत्तेच्या सहभागामुळे आघाडी सरकार अस्तित्वात आले.त्यामुळे साहाजिकच संमिश्र मंत्रीमंडळामुळे आपली संसदीय शासनपध्दती अस्थीर –ÖÖ»ÖßÖ †ÖÆ. ' १९९० नंतर आपल्या प्रादेशिक पक्षाची भूमिका महत्वपुर्ण खाते मिळविण्यासाठी असलेली धडपड,तत्त्वशून्य तडजोडी,पंतप्रधानाचे कमकुवत –ालेली स्थान,प्रादेशिक हिताला प्राधान्य अशा बाबी समोर आल्या आहेत.अर्थात तत्वशून्य आणि ध्येयहीन आघाड्या जेव्हा सत्ता प्राप्तीसाठी निर्माण होतात तेव्हा राष्ट्रहित,राष्ट्रविकास बाजूला सारला जातो अशावेळी प्रोदशिक पक्ष आपल्या हिताचा आणि अस्मितेचा के¾ÖÔ¡ ×¾Ö"ÖÖ¸¡ करतात.कोणत्याही एका राष्ट्रीय पक्षाला न मिळणारे बहुमत त्यात प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व आणि त्यांचे प्राबल्य हे आजच्या भारतीय लोकशाहीपुढील एक नवे आव्हाणच बनले आहे.'[13] यासाठी उपाययोजना म्हणजे पंतप्रधानाची प्रत्यक्ष जनतेकडून निवड करणे,संसदेतून पंतमप्रधानाची निवड करणे,संसदेतून पंतप्रधानाची निवड करणे,राष्ट्रीय पक्षांनाच संसदेच्या निवडणूकीत भाग घेण्याची परवानगी देणे,राष्ट्रीय पक्ष होण्यासाठी एकूण जागेच्या किमान १०% जागा प्राप्त करणे बंधनकारक करणे अशा प्रकारच्या

सुधारणा करून भारतीय लोकशाही पुढील आव्हाणावर मात करू शकते.परंतु सध्याच्या परिस्थितीत भारतीय राजकारणाची दिशा ही प्रादेशिक पक्षांच्या परिणितीवर †Ö¬ÖÖ¸¡»Ö»ÖÖß †ÖÆ.

सांप्रदायिकता,धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही :

_____भारतीय राजकारणात दुरगामी बदल म्हणजे धार्मिक आधारांवर राजकारणाचा उदय होय.त्यामुळे लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात चर्चा केंद्रस्थानी राहीली.भारतात अनेक पक्ष असतांना प्रदिर्घ काळ काँग्रेस सत्तेमध्ये होते.याला रजनÖß कोठारी यांनी "एकदलीय व्यवस्था किंवा एकपक्षीय" शासन किंवा काँग्रेस व्यवस्था असे म्हटले आहे. १९६७ मध्ये प्रांतीय पक्ष तसेच अन्य राष्ट्रीय पक्ष उदा.जनता पार्टी (१९७७) जनता दल (१९८९) भाजपा (१९९१) प्रमाणे विरोधी पक्षांचा उदय आणि विकासामुळे एकदलीय व्यवस्थेचा ऱ्हास सूरू –ाला.आणीबाणीनंतर भारतीय जनसंघ,जनता पार्टी (१९७७) सरकार मध्ये सामाविष्ट –ाला,जनता पार्टीचे अंतर्गत कलह व दुहेरी निष्ठा यामुळे अवघ्या अडीच वर्षात ४५ पक्षांचे विघटन –ाले.पुर्वीच्या जनसंघाच्या समर्थकांनी भारतीय जनता पक्षाची १९८० मध्ये त्यांनी स्थापना केली. गांधीवादी समाजवादी विचारधारेवर विश्वास ठेवला मात्र त्यांना १९८४ साली लोकसभेच्या निवडणुकीत केवळ दोन जागा मिळाल्या १९८६ नंतर या पक्षांनी आपली विचारधारा हिंदु राष्ट्रवादांच्या तत्त्वांवर आणली हिंदुच्या विचारधारेचा रस्ता निवडून हिंदुना संघटीत करण्याची रणनीती आखली,त्यापैकी एक रामजन्मभूमी आंदोलन होय."भारतामध्ये जातीय व धार्मिक आधारवर पक्ष निर्माण होतात.राष्ट्रहितापेक्षा जातीय आणि धार्मिक हित अजूनही लोकांना ´ÖÆ¢¾ÖÖ"Ö ¾ÖÖ™ते कधी-कधी प्रांतीक आणि भाषिक आधारावरही पक्षनिर्मिती आहे."[15] धार्मिक व प्रांतीय जातीय आधारांवर राजकीय पक्ष निर्णय घेवून धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेला हादरा देत असतात.तलाकशुदा मुस्लिम महिला शाहबानो यांनी सर्वोच्च न्यायालयात पोटगीचा दावा दाखल केला.न्यायालयांनी शाहबानोच्या बाजूने निर्णय दिला.परंपरावादी मुस्लिमांना पर्सनल लॉ मध्ये हस्तक्षेप वाटला काही मुस्लिम नेत्यांच्या मागणीनुसार मुस्लिम महिला अधिनियम संसदेत राजीव गांधीनी पास करून घेतले याचा विरोध बुध्दीजीवी मुस्लिम महिला व इतर महिला संघटनेनी विरोध केला.भाजपांनी काँग्रेस सरकारवर अल्पसंख्याक समुदायाला अनावश्यक सवलती तसेच सांप्रदायिक राजकारणावर टिका केली.

आयोध्या विवाद :-

_____फैजाबाद जिल्हा न्यायालयांनी १९८६ मध्ये असा निर्णय दिला की; बाबरी मशिदचा दरवाजा उघडला पाहीजे जेणे करून हिंदु येथे पुजा करेल.कारण ते या जागेला पवित्र मानतात.या प्रश्नावर अनेक दशकांपासून वाद चालू होता.हिंदुच्या मतानुसार मीर बाकीनी १६ व्या शतकात राम मंदिराला तोडून त्या जागेवर मस्जिद बनवली.दरवाजा उघडल्यानंतर हिंदू-मुस्लिम समुदाय या मुद्यावर संघटीत करण्याचे प्रयत्न करू लागले.भाजपांनी या प्रश्नाला निवडणुकीतील मुद्दा बनविला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषदेच्या लोकांनी सातत्यपुर्ण प्रतीकारात्मक कार्यक्रम सुरू केले.त्यांनी जनसमर्थन एकत्रित करण्यासाठी गुजरातमधील सोमनाथ ते आयोध्या पर्यंत रथयात्रा काढली. जे संगठन राममंदिराचे समर्थन करीत होते,त्यांनी डिंसे १९९२ मध्ये कारसेवेचे आयोजन केले होते.राम भक्तांना आव्हाण केले होते की,राम मंदिर निर्माण करण्यासाठी श्रमदान करावे. संपूर्ण देशात वातावरण तनावपुर्ण होते.सर्वोच्च न्यायालयांनी राज्य सरकारला आदेश दिला होता कि; वादातील स्थळाची पुर्ण संरक्षण करावे.परंतु देशातील विविध भागातून लोक एकत्रित येऊन त्यांनी ६ डिसेंबर १९९२ मध्ये मस्जिदला उध्दवस्त केले. त्यानंतर मुंबईसह अन्य राज्यात हिंसा भडकली. उत्तरप्रदेश सहीत अन्य भाजपाचे राज्य सरकार बरखास्त करण्यात आले.एस.आर.बोम्बई विरूध्द भारत (ÖÖ'Ö) विवादात मध्यप्रेदश,हिमाचलप्रदेश आणि राज्यस्थानचा भाजपा सरकार बरखास्तीचा निर्णय देतांना न्यायमुर्ती रामा स्वामी यांच्या मतानुसार, "लोकशाही शासन व्यवस्था संघीय संरचना, राष्ट्राची एकता आणि अखंडता,धर्मनिरपेक्षता,समाजवाद,सामाजिक न्याय तसेच न्यायालयीन पुनर्विलोकन घटनेचे मुक वैशिष्टयÖ †ÖÆ."[16] सर्वोच्च न्यायालयाने नरसिंहराव शासनाची संबंधित राज्यात ३५६ कलमाची अंमलबजावणी वैध ठरविली. तथापि त्याबाबत पुढील बाबी नमुद केल्या.धर्मनिरपेक्षता हे भारतीय घटनेच्या मौलिक

सरंचनेचा भाग आहे. त्यामुळे या वैशिष्ट्यांचा भंग करणारी बाब अवैद्य ठरते त्याचबरोबर संघराज्यात्मक वैशिष्टय हेही भारतीय घटनेच्या मौलीक संरचनेचा भाग आहे.म्हणजेच ३५६ कलमांचे न्यायीक पुनरावलोकन करता येते. राज्याविधान सभेत सिध्द –ाल्याशिवाय राज्यपालानी शासन अल्पमतात आले म्हणून बरखास्त करण्याची घाई करू नये पक्ष फूट किंवा घटक पक्षाने पाठिंबा काढून घेतल्याने विश्वास गमवल्यास योग्य पर्यायांचा शोध घेऊनच राज्यपालाने विधान सभा बरखास्त करण्याचा निर्णय घ्यावा. संसदेच्या मान्यतेशिवाय विधानसभा बरखास्त करू नये.

इंदिरा गांधीच्या वादात न्यायमुर्ती चंद्रवूड यांनी म्हटले की, "प्रत्येक विशिष्ट प्रकरणात अमृत रूपात नाही मात्र महत्वपुर्ण समस्याच्या संदर्भात मुळ संरचनेच्या संदर्भात विचार करणे गरजेचे आहे."[17] यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेला धक्का बसला. १९८४ मध्ये शिख विरोधी दंगे तसेच फेब्रु - मार्च २००२ मध्ये गुजरातमध्ये मुस्लीम समुदयांच्या विरूध्द हिंसा भडकली.अल्पसंख्याक समुदायाच्या विरोधात अशा हिंसा आणि दोन समुदायात हिंसात्मक संघर्ष लोकशाहीसाठी धोका आहे.२००2 च्या गुजरात दंगलीत ११०० व्यक्ती मारल्या गेल्या त्यामध्ये जास्तीत जास्त मुस्लिम होते.राजकीय फायद्यासाठी धार्मिक भावनांना भडकावणे लोकशाहीसाठी धोकादायक ठरले.१९८९ ते १९९९ या दहा वर्षाच्या राजकारणाची बेरीज वजाबाकी पाहिली तर भाजपाने बेरजेचे राजकारण केलेले आहे.लोकसभेतील भाजपाच्या सदस्यसंख्येची चढती कमान दिसून येते.कॉग्रेस पक्ष आणि जनता दल यांच्या विघटनाची परिणती भाजपाच्या सदस्य संख्यावाढीत आली आहे.

"आयोध्या येथे राममंदिर बांधण्याचा आग्रह, समान नागरी कायदा आणि जम्मू-काश्मीरला लागू असलेले घटनेतील ३७० वे कलम रद्द् करणे या तीन गोष्टीवर भर देऊन भाजपाने १९८९,१९९१ आणि १९९६ च्या निवडणूका लढविल्या आहेत."[18] ¯Ö¸ÜÖ या तीन गोष्टी मित्र पक्षाला घातक ठरतील. हे ओळखुनच भाजपाने या तीन गोष्टी आपल्या निवडणुक जाहीरनाम्यातून काढून टाकल्या. त्यामुळेच १२ व १३ व्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाला यश प्राप्त करता आले.मात्र २००४ व २००९ च्या निवडणुकीत पक्षाला अनुक्रमे १३८ व २१६ जागा प्राप्त केल्या.१६ व्या लोकसभेत देखील भाजपाने कळीचे मुद्दे बाजूला ठेवून विकास आणि सुशासनावर भर दिला आहे.तसेच नरेंद्र मोदीचे बहुजनवादी राजकारण तसेच गुजरात विकास मॉडेलमुळे नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान पदासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यात आले.नरेंद्र मोदी यांनी आर.एस.एस.तसेच उच्चवर्णीय नेत्यांचा विरोध असला तरी मोदी लोकप्रियतेमुळे त्यांचा नाईलाज दुसरे कारण की कॉंग्रेसचे कमकुवत नेतृत्व सोनिया गांधी व राहुलगांधीच्या रूपाने मिळाले.गांधी परिवाराभोवतीच राजकारण फिरत राहील्याने गांधी परिवाराव्यतिरिक्त नेतृत्व निर्माण –ाले नाही.तसे होणाचा प्रयत्न –ाल्यास डावलण्यास आले.कॉंग्रेसमधील गट - तट गांधी परिवारांच्या नेतृत्वाखाली एक होतात हा अनुभव आजपर्यंत आहे.त्यामुळे कॉंग्रेस पक्षाचा ऱ्हास होत आहे.भ्रष्टाचार अकार्यक्षम केंद्र सरकार, आघाडी सरकारमध्ये नसलेला समन्वय,पंतप्रधानाची दुर्बलता सोनिया व राहुल गांधीचे अकार्यक्षम धोरणे यामुळे जनमानसात कॉंग्रेसची प्रतिमा डागाळली व त्याचा फायदा भाजपाला –ÖÖ»ÖÖ.
पहिला मुद्दा असा की,भारतात बहुपक्षपध्दती असली तरी सुरूवातीच्या ४० वर्षाच्या काळात कॉंग्रेस हा एकमÖ¾Ö ¯Ö³ÖÖ¾ÖÖß ¿ÖŒŸÖß¿ÖÖ»ÖÖß पक्ष होता.१९७७-80 ŸÖÃÖ"Ö 1989-९१ कालावधी सोडला तर कॉंग्रेस प्रभावी पक्ष होता.मात्र १९९६ पासून भारतीय राजकारणात आघाड्याची सरकारे स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू –ाली.संपुर्ण देशात प्रादेशिक राजकीय पक्षांचे प्राबल्य वाढत असून राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये आघाडी सरकार हा एकमेव मार्ग उपयुक्त म्हणून स्विकारला जात आहे.त्यामुळे कॉंग्रेस पक्ष प्रभुत्वशाली न राहता कमकुवत –ÖÖ»ÖÖ †ÖÆ.

दुसरा मुद्दा असा की,मंडल आयोगाच्या राजकारणामुळे इतर मागासप्रवर्ग आपल्या हक्कासाठी जागृत होऊन इतर मागास प्रवर्गातून नेतृत्व उदयाला आले आहे.मंडल आयोगाच्या अंमलजावणीसाठी जनता दलाने केलेल्या स्तुत्य प्रयत्नाला भारतीय राजकारणात तोड नाही.त्यांची परिणीती म्हणून या पक्षांनी उत्तरप्रदेश,हरियाना,राज्यस्थान,गुजरात,बिहार या राज्यात विशेष प्रभाव पाडला मात्र जनता दलाच्या फुटीमुळे तसेच जनता दलातील जेष्ठ नेत्यांचे व्यक्तीगत मतभेद व संघर्षामुळे विविध पक्षांत विघटन –ाले.१९७७ व १९८९ मध्ये सत्तेवर असणारा जनता पक्ष किंवा जनता दल विघटित व क्रियाशुन्य –ाला आहे.त्यांचा फायदा ÖÖ•Ö¯ÖÖ - कॉंग्रेसला –ाला आहे.तिसरा मुद्दा असा आहे की, भारतात प्रोदशिक पक्षांची केंद्राच्या सत्तेमधील सहभागाकरिता स्वीकृत करण्यात आली आहे.प्रादेशिक पक्ष केंद्रातील सत्तेमध्ये सहभागी होत आहे.या पक्षांनी २० वर्षापासून देशाच्या राजकारणात महत्त्वपुर्ण भूमिका ¯ÖÖ¸ü ¯ÖÖ›»ÖÖß †ÖÆ.

चौथा मुद्दा असा की,काँग्रेसमध्ये सर्व क्षेत्रात मोठे - मोठे नेते होते.नेत्यांना आप-आपल्या कार्यक्षेत्रतून काढून करून दिल्लीत ²ÖÖलावले.त्यामुळे काँग्रेसचे प्रभुत्व कमी –ाले.बहुलतावादी संस्कृती आणि विविधतेच्या ओळखीमुळे आघाडी सरकार सत्तेवर आली.अनेक नेते काँग्रेसला सोडून गेल्यानंतर बहुलतावाद आघाडीचे राजकारण सुºþ –ÖÖ»Ö.

आघाडीच्या राजकारणामध्ये विचारधारेला महत्त्वदेण्याऐवजी सत्तेमधील भागीदारीला महत्त्व देण्यात येत आहे.अनेक पक्ष भाजपाच्या हिंदुत्वाच्या विचारधारेशी सहमत नाही.मात्र अस पक्ष भाजपाच्या आघाडीमध्ये सामाविष्ट –ाले व सरकार बनविली.त्यांची पाच वर्षे सत्तेमध्ये भागीदारी राहीली.मागील काही दशकात सांप्रदायिक राजकारण करून अल्पसंख्याक समाजात विश्वास निर्माण केला; असला तरी ती दरी कमी करण्यावर भाजपाचा प्रयत्न आहे.

आघाडी सरकारनी चांगले काम सुध्दा केले.मंडल आयोग लागू करणे १९९६ नंतर आघाडी सरकारनी गरी²ÖÖÃÖÖŠß लालकार्ड योजना तयार करणे,१९९८ नंतर एनडीए सरकारने तीन राज्यांची निर्मिती करणे आदी.कामे केली.खरे तर प्रादेशिक आकांक्षा आणि कमकुवत समुदायांची आकांक्षाची पूर्ती आघाडी सरकारच्या काळात –ाली.भारतात शेकडो भाषा बोलल्या जातात.अनेक राज्यात हजारो जाती आहे.अनेक समुदाय आणि राष्ट्रीय आकांक्षासोबत सर्वांच्या स्वतःच्या आकांक्षा आहेत.सर्वांची पुर्ती आघाडीच्या सरकारव्दारे होऊ शकते.मात्र भाजपनी स्वबळावर लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळविले तसेच त्यांच्या एनडीए »ÖÖ ३३७ जागा मिळाल्या त्यामुळे एकपक्षीय राजकारणचा पुर्नजन्म –ाला.तो देशांच्या स्थर्योच्या तसेच राष्ट्रहिताच्या दृष्टीने शुभ संकेत †ÖÆ.

1. डॉ.बी.एल.फडिया, डॉ कुलदीप फडिया - भारतीय शासन व्यवस्था एवं भारत का संविधान,साहित्य भवन प्रकाशन आगरा,२०१२ ¯Ö.- 207
2.कित्ता - ¯Ö.207
3. ²ÖÖß.²ÖÖß.¯ÖÖ™ß»Ö - फडके प्रकाशन कोल्हापूर,२००६ पृ. ३१५
4.http.//en.m.wikipe.....p.2,3,4
5. संजय कुमार (संपादक) - भारतीय राजनीती,राजव्यवस्था एवं संसद,जवाहर पब्लिशर्स एन्ड डिस्ट्रीब्युटर्स,२००५ पृ. १९२
6. कित्ता,डॉ.बी.एल.फडिया, डॉ कुलदीप फडिया - ¯Ö.313
7. कित्ता,बी.बी.पाटील - ¯Ö. 135
8. कित्ता,डॉ.बी.एल.फडिया, डॉ कुलदीप - ¯Ö.292
9. कित्ता,बी.बी.पाटील - ¯Ö.317
10. कित्ता - ¯Ö.313,314
11. कित्ता,डॉ.बी.एल.फडिया, डॉ कुलदीप फडिया - ¯Ö.332
12. कित्ता - ¯Ö.328
13. कित्ता - ¯Ö. 328,329,330
14. एस.लक्ष्मीकांत - भारत की राज्यव्यस्था,टाटा मॅग्रेव्हहिल एज्युकेशन प्राइव्हेट लि.वेस्ट पटेल नगर,नईदिल्ली.२०१२ अध्याय ५९ ¯Ö.59.3
15. प्रा.चि.ग.घागरेकर - भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण,श्री मंगेश प्रकाशन नागपूर २०१२ पृ.२४७
16. सुभाष काश्यब - Æ´ÖÖ¸Ö ÃÖ×¾Ö-Öान,भारत का संविधान और संविधानीक विधी नॅशनल बूक ट्रस्ट इंडिया पृ.२६८
17. कित्ता - 268
18. कित्ता,डॉ.बी.एल.फडिया, डॉ कुलदीप - ¯Ö.330